**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक १९ | बुधवार,दि.१३ एप्रिल २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# देवरीतील अनाधिकृत मेडीकल लॅब वर पोलिसांची कार्यवाही

- श्री क्लिनीकल लेबॉरेटोरीतील मशिनरीसह चार लाखाचा मुद्देमाल जप्त
- पॅरावैद्यक कायद्यांतर्गत राज्यातील दुसऱ्या गुन्ह्याची नोंद



**गोंदिया:–** वैद्यक प्रयोगशाळा चालविण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही परवानगी नसताना देवरी शहरातील मध्यभागी बिनधास्त सुरू असलेल्या श्री क्लिनिकल लॅबोरेटोरीवर काल (दि.१०) रोजी देवरी पोलिसांनी कार्यवाही करीत सुमारे ३ लाख ८० हजाराचा मुद्देम ाल जप्त केला. या प्रकरणी सदर प्रयोगशाळा संचालकाच्या विरुद्ध महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद २०११ च्या कलम ३१ व ३२ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. सदर कार्यवाहीमुळे गोंदिया जिल्ह्यात बेकायदेशीर प्रयोगशाळा चालविणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

उल्लेखनीय म्हणजे पॅरा वैद्यक कायद्यांतर्गत नोंदविलेला हा गुन्हा महाराष्ट्र राज्यातील दुसरा गुन्हा देवरीत दाखल झाल्याचे सांगितले जात असून यापूर्वी नागपूर जिल्ह्यातील काटोल शहरात ७ एप्रिल रोजी पहिल्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे, हे विशेष.

सविस्तर असे की, देवरी शहराच्या मध्यभागी असलेल्या कारगील चौकात भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथील जितेश प्रेमलाल येळमे यांची श्री क्लिनिकल लेबोरेटोरी नावाची वैद्यक प्रयोगशाळा गेल्या काही वर्षापासून सुरू आहे. या संबंधीची माहीती मेडीकल लेबोरेटोरी टेक्नालॉजिस्ट असोशियन ऑफ महाराष्ट्र यांचे निदर्शनात आली.

सदर संस्था ही राज्यातील लॅब धारकांना अद्यावत माहिती देणे, त्यांचे हित व हक्कासाठी काम करीत आहे. महाराष्ट्र परावैद्यक परिषद मुंबई यांचे अधिकृत पत्रानुसार गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथे अनाधिकृतरीत्या श्री क्लिनिकल लेबोरेटोरी सुरू असल्याची माहिती मिळाली. या प्रकरणातील फिर्यादी हे मेडीकल लेबोरेटोरी टेक्नालॉजिस्ट असोशियन ऑफ महाराष्ट्र यांचे काम पाहत असल्याने त्यांनी सदर प्रयोगशाळेला भेट देवून तपासणी केली असता जितेश येळणे यांचेकडे सदर प्रयोगशाळा चालविण्यासाठी आवश्यक असलेले कोणतेही कागदपत्रे नसल्याचे दिसून आले. तशी तक्रार फिर्यादीने देवरी पोलिसात दाखल केली.

या तक्रारीवरून अपर पोलीस अधिक्षक अशोक बनकर यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार रेवचंद शिंगनजुडे यांनी सदर केंद्रावर धाड टाकून तपासणीसाठी वापरण्यात येणारी यंत्रे ताब्यात घेतली. यामध्ये सुमारे ३ लाख किमतीची सीबीसी रोल काऊंटर मशिन आणि सुमारे ८० हजार रुपये किमतीची बॉयो केमिस्ट्री मशिन असा ३ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.



सदर कार्यवाहीमध्ये ठाणेदार सिंगनजुडे यांचे सह सहायक पोलिस निरीक्षक आनंदराव घाडगे, पोलिस नायक सुधीर जांगडे, हातझाडे ना पो शि,पोशि डोहळे व पोशि नेवारे यांचा समवेश होता. या गुन्ह्यातील पुढील तपास सहायक पोलीस निरिक्षक आनंदराव घाडगे करित आहेत.

# जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा निवडणुकीचा मार्ग मोकळ



**गोंदिया :**गोंदिया आणि भंडारा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका पार पडून तीन महिन्यांचा कालावधी लोटला ; मात्र अद्यापही अध्यक्ष आणि सभापती पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला नव्हता. त्यामुळे निवडून आलेल्या जि.प.सदस्यांच्या अधिकारांचे हनन होते; मात्र मंगळवारी ग्रामविकास विभागाने काढलेल्या पत्रा मुळे आता या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्याच्या ग्रामविकास विभागाने नागरिकांच्या मागास प्रवर्गातील पंचायत समि ती सभापती, सरपंच व ग्रामपंचायत पंचायत समिती सभापती पदाची निवडणूक होण्याचा मार्गसुद्धा मोकळा झाला असल्याचे निवडणूक विभागाच्य अधिका ?यांनी सांगितले.

सवीच्य न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण रद्द केल्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लांबल्या होत्या. त्यानंतर सवीच्य न्यायालयाने ओबीसी जागा सर्वसाधारण करून निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले. त्यानुसार जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका पार पडल्या . या निवडणुकीचा निकाल १९ जानेवारीला जाहीर झाला.त्यानंतर पंधरा दिवसात अध्यक्ष आणि सभापती पदाची निवडणूक होणे अपेक्षित होते; मात्र ओबीसी आरक्षण रद्द झाल्याने अध्यक्ष आणि सभापती पदाच्या निवडणुका या जुन्या आरक्षणा नुसार घ्यायचे की नव्याने आरक्षण काढायचे, असा पेच जिल्हा निवडणूक विभागासमोर निर्माण झाला होता.त्यामुळे त्यांनी ग्रामविकास विभागाकडे मार्गदर्शन मागितले होते;मात्र ग्रामविकास विभागाने यावर आपले मत नोंदविण्यासाठी तब्बल तीन महिने लावले. त्यामुळे निवडून आलेले सदस्य त्यांच्या अधिकारापासून वंचित होते; मात्र मंगळवारच्या ग्रामविकास विभागाच्या पत्राने जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती पदाच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

## निवडणुकीच्या तारखेकडे लक्ष

**ग्रामविकास विभागाच्या पत्रानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती पदाच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. आठपैकी दोन पंचायत समितीचे आरक्षण हे नामाप्र निघाले होते.त्याम ुळे सवीच्यन्यायालयाच्या निर्णयानुसार नामाप्र जागा सर्वसाधारण केल्या जाणार आहे.ही सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर जि.प.अध्यक्ष आणि सभापती पदाची निवडणूक होणार असल्याची माहिती आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती पदाची निवडणूक ही एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात अथवा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

**जिल्हा परिषद निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन तीन महिन्याचा कालावधी लोटला मात्र अध्यक्षआणि सभापती पदाची निवडणूक अद्यापही घेण्यात आली नाही . त्यामुळे निवडून आलेल्या जिल्हा परिषद आणिपंचायत सदस्यांच्या अधिकारांचे हनन होत आहे. शासनाने यावर अद्यापही तोडगा न काढल्याने निवडून आलेल्या२६ जि.प. सदस्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात ४ एप्रिलला याचिका दाखल केली आहे. आता लक्ष याचिकेच्या सुनावणीकडे– जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती पदाच्या निवडणुकीचा तिढा अद्यापही सुटला नसल्यानेजि ल्हा परिषद सदस्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आता पुढील आठवड्यातसुनावणी होणार असल्याने त्याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.**

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात भरीव योगदान द्या-पालकमंत्री प्राजक्त तनपुरे



**गोंदिया :** विकासासाठी सर्व विभागांनी प्रयत्नरत राहून शासनाच्या योजना सर्व सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध रहावे असे निर्देश राज्यमंत्री, नगरविकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र राज्य तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी दिले. आज जिल्ह्यातील सर्व विभागाची आढावा बैठक त्यांनी घेतली. आपला गोंदिया जिल्हा विकासात अग्रेसर राहण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. आमदार मनोहर चंद्रिकापूरे, जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, उपवनसंरक्षक कुलराज सिंह, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी व विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्याची यावेळी माहिती दिली. धानाचे कोठार म्हणून जिल्ह्याची ओळख असल्याचे त्यांनी सांगितले. सन २०२०-२१ मध्ये एकूण १५१ धान खरेदी केंद्रावर ७२ लाख क्विंटल धान खरेदी करण्यात आले असून सन २०२१-२२ मध्ये ४४ लाख क्विंटल धान खरेदी करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. जिल्ह्यात कोविड लसीचा पहिला डोस घेणाऱ्यांची संख्या १० लाख ६२ हजार ९३२ व दोन्ही डोस घेणाऱ्यांची संख्या ८ लाख ३१ हजार १०६ एवढी आहे.

स्वच्छ भारत मिशन, ग्रामीण पाणी पुरवठा, आरोग्य योजना व ग्रामीण विकासाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादरीकरण केले. यावेळी पालकमंत्र्यांनी वीज विभागाचाही आढावा घेतला. यात प्रामुख्याने वीज जोडण्या, सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, अनुसूचित जाती उपयोजना, अनुसूचित जमाती उपयोजना, मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना व अन्य योजनांचा समावेश आहे. गोंदिया शहरात भूमीगत वीज वाहिनी टाकणे याबाबतीतही यावेळी चर्चा करण्यात आली. पाणी पुरवठा योजना सौर ऊर्जेवर घेण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

नगरविकास विभागाच्या विकासाचा यावेळी आढावा घेण्यात आला. सुवर्ण जयंती नागरोत्थान योजनेत मिळालेला निधी वाटप करण्यात आला. जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त निधी नगरपालिकांना वितरित करण्यात आला आहे. त्यामाध्यमातून विकास कामे सुरू झाली आहेत. अशी माहिती जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी दिली. शहरात साधारण ७० टन कचरा निर्माण होत असून तो कचरा खासगी प्रकल्पाला व्यवस्थापन करण्यासाठी देण्यात येतो. हा अभिनव उपक्रम आहे.

गोंदिया जिल्ह्यात साधारण ४८ टक्के वनक्षेत्र आहे. शासनाच्या विविध योजना या भागात प्राधान्याने राबविण्यात येत असल्याचे उपवनसंरक्षक कुलराज सिंह यांनी सांगितले. जिल्हा वार्षिक योजनेत रोपवन घेण्यात आले आहेत. रोपवन जगण्याचे प्रमाण ९० टक्क्यांवर आहे. हाजराफॉल येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असून यावर्षी २३ लाख रुपये महसूल प्राप्त झाला. पांगडी येथे जैवविविधता उद्यान करण्यात आले आहे. गडेगाव येथे मोहफुल प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले आहे.

जिल्ह्यात पावसाची सरासरी चांगली असून ६५ हजार हेक्टरवर उन्हाळी भाताची पेरणी झाली आहे. कृषी विभागाच्या विविध योजना जिल्ह्यात राबविण्यात येतात. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतूनही कृषी विकास योजना राबविण्यात येतात. जिल्हा वार्षिक योजनेत सन २०२१-२२ साठी तिन्ही योजना मिळून २५४ कोटी निधी प्राप्त झाला होता, तो शंभर टक्के खर्च झाला असल्याची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले यांनी दिली. कोविड, लसीकरण, आरोग्य विभाग, आदिवासी विभाग, समाज कल्याण विभाग, जिल्हा नियोजन आदी विभागाचा यावेळी आढावा घेण्यात आला. प्रत्येक विभागाने सादरीकरण करून माहिती दिली.

पणन हंगाम २०२१-२२ मध्ये पणन विभाग व आदिवासी विकास महामंडळामार्फत जिल्ह्यात ४४ लाख १० हजार क्विंटल धान खरेदी झाली असून १३.३५ लाख क्विंटल भरडाई झाली आहे. भरडाई प्रक्रिया अधिक गतिमान करून उर्वरित धानाची भरडाई तातडीने करावी असे निर्देश राज्यमंत्री नगरविकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र राज्य तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी संबंधित यंत्रणेला दिले.

# जि.प.मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर कारवाई करा



## जि.प.सदस्यांची मागणी न्यायालयाकडे करणार तक्रार

**गोंदिया:** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जिल्हा परिषदेच्या १३ कोटी रूपयांच्या निविदेत १७ मार्च रोजी स्थगिती दिली. मात्र यानंतरही या निवेदेतील कामे बॅकडेटमध्ये देण्यात आल्याचा आरोप जि.प. सदस्य संजय टेंभरे व लक्ष्मी तरोणे यांनी केला आहे. तसेच न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रभारी कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करण्यात यावी, यासाठी हे न्ही सदस्य उच्च न्यायालयाकडे तक्रार करणार आहेत.

जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे प्रभारी अभियंता यांनी नियमबाह्यपणे १३ कोटी रुपयांची निविदा काढून त्यातील कामे मॅनेज केल्याचा आरोप जि.प. सदस्यांनी केला होता. तसेच या निविदेतील कामांना स्थगिती मिळावी यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर १७ मार्च रोजी न्यायालयाने या निविदांना स्थगिती दिली होती. मात्र यानंतरही संबंधित अधिकाऱ्यांनी या निविदेतील कामे १० मार्च या बॅकडेटमध्ये दाखवून त्याचे कार्यारंभ आदेशसुद्धा कंत्राटदाराला दिल्याचा आरोप आहे. बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांनी कामाच्या ठिकाणी जाऊन काम सुरु होण्यापुर्वीच चाचणी अहवाल दिल्याचे बोलले जाते. सडक अर्जुनी उपविभागात ही कामे बॅकडेटमध्ये असल्याने कामे सुरु करण्यात आली नाहीत. विशेष बांधकामासाठी वापरले जाणारे साहित्य ब्लॉक तयार करुन त्याची तपासणी केली जाते. तर मुख्यमंत्री सडक योजनेच्या कामासाठीसुद्धा हाच नियम आहे. मात्र या सर्व प्रकारात जि.प. बांधकाम विभागाकडून नियमांचे उल्लघंन केले जात असल्याचा आरोप आहे. तसेच या सर्व प्रकाराकडे मुकास दुर्लक्ष करीत असल्याने त्यांच्यावरसुद्धा कडक कारवाई करावी, अशी मागणी न्यायालयाकडे करणार असल्याचे जि.प.सदस्य संज़य टेंभरे यांनी सांगितले.
















# १० वर्ष जुन्या पुलावरून जीवघेणी वाहतूक सुरूच

**रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे येत्या महिन्यात गोंदिया रेल्वे स्थानकाचा आढावा घेण्याकरिता गोंदियात येणार आहेत. त्यावेळी गोंदिया रेल्वे स्थानकाला रेल्वे विभागाकडून महत्वपूर्ण सुविधा व रेल्वे गाड्यांची भेट मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सोबतच नवीन रेल्वे पूलाचे भूमिपूजन होण्याची शक्यता आहे.**



**अडीच वर्षानंतरही प्रस्ताव अधांतरी**

**गोंदिया :** शहराच्या दोन भागांना जोडणारा जुना पुल धोकादायक असल्याचा अहवाल स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये देण्यात आला आहे. नवीन पुलाचा प्रस्ताव तयार करण्यात आला. त्याला अडीच वर्षाचा काळ लोटला. मात्र अद्यापही प्रस्तावाला मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे या पुलावरील जीवघेणी वाहतूक अद्यापही सुरुच आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातंर्गत जवळपास ९० वर्षापूर्वी शहरातील गोंदिया-बालाघाट मार्गावर उड्डानपुल तयार करण्यात आला. याच पुलाच्या खालून रेल्वेचा ट्रॅक गेला आहे. या पुलाला बरीच वर्षे झाली असल्याने व रेल्वे ट्रॅक परिसरातील पुलाचा काही भाग जीर्ण होऊन तो कोसळत असल्याने याची तातडीने दखल घेत रेलवे विभागाच्या तांत्रिक विभागाने पुलाची पाहणी केली. त्यात जुना पुल जीर्ण झाला असल्याची बाब पुढे आली. त्यामुळे त्यांनी याची गांभीर्याने दखल घेत जिल्हाधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाला तसे पत्र दिले. तसेच या पुलावरील सर्व जड वाहतूक तातडीने बंद करुन सहा महिन्यात जुना जीर्ण उड्डानपुल पाडण्याची सूचना केली. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने थातूरमातूर दुरुस्ती करुन व हा पुल पाडून त्या ठिकाणी नवीन उड्डानपुल तयार करण्यासाठी ८४ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला. याला तब्बल अडीच वर्षाचा कालवधी लोटला असून अद्यापही कुठलीच कारवाई झाली नाही. त्यामुळे प्रशासनाची उदासनिता व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष शहरवासीयांच्या सुरक्षेसाठी घातक ठरण्याची शक्यता नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.






## संपादकीय

# आंबेडकरी पत्रकारिता हाच मुख्यप्रवाह!

माध्यमं हा जनमानसाचा आरसा असतो असं म्हणतात. पण हा आरसा तुम्हाला खरे प्रतिबिंब दाखवलेच असं काही नाही. माध्यमं तुम्हाला समाजाचं तेच रूप दाखवतात जे त्यांना दाखवायचंय. जर माध्यमांकडे बघून आपण आपल्या समाजाचा अंदाज बांधायला गेलो तर भारतीय समाज अत्यंत संपन्न, इतर काही कामं शिल्लक नसल्याने गाईच्या आणि बाईच्या मागे लागलेला, हिंदुत्ववादी विचारसरणीचा किंवा हिंदूराष्ट्र वगैरे वाटायला लागेल. माध्यमांकडे बघून समाजाचा अंदाज बांधायला गेलो तर भारतात दररोज मूर्खपणा सिद्ध करण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा लागलेल्या असतात की काय असा ही समज होऊ शकतो. त्यामुळे माध्यमांची चर्चा करायची असेल तर त्यांच्याकडे सुवर्णालंकारी कोंदणातून न पाहता वस्तुनिष्ठ पद्धतीने पाहिलं पाहिजे.

भारतीय माध्यमं हा देशाचं खरा चेहरा दाखवू शकत नाहीत हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधीच ओळखलं होतं. काँग्रेसच्या दावणीला बांधलेली माध्यमं आणि पत्रकार 'जो तुमको हो पसंद वहीं बात करेंगें' अशा पद्धतीनेच वागणार. अशा वेळी आपलं स्वत:चं माध्यम असायला हवं, जे दलित–शोषित जनतेचा आवाज उचलेल अशी गरज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होती. यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेला सुरूवात झाली. एका दृष्टीकोनातून यासाठी काँग्रेसचे आभार मानायला हवेत. माध्यमांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले चिंतन हे आजही किती मोलाचं आहे. माध्यमांवर एका विशिष्ट पक्ष, भांडवलदार आणि विचारांची मालकी आल्यावर कस करायला पाहिजे, असा प्रश्न मला पडला नाही. मला त्यासाठी विचार करण्यावर वेळ घालवावा लागला नाही.

आपला विचार मांडायचा तर माध्यमं आपली असली पाहिजेत. मुख्यप्रवाहातील माध्यमांकडून फार अपेक्षा ठेवता येणार नाही, एखादा हिरो पकडायचा आणि त्याची पूजा करायची हा प्रकार तेव्हाही सुरू होता आणि आजही सुरू आहे. फरक एवढाच आहे की तेव्हा मुख्य प्रवाह हे करत होता, आता मुख्य आणि पर्यायी माध्यमं ही हेच करताना दिसतायात.मुख्य प्रवाहातील माध्यमं पक्षपातीपणे वागल्यामुळे समाजातील महत्त्वाचे प्रश्न, लढे, हितसंबंधांना बाधा आणणारे विषय यांकडे पूर्णत: डोळेझाक होते. कधी कधी माध्यमांचा अजेंडा इतका विषारी असतो की जर तुम्ही तयारीचे नसाल तर तुम्ही संपून जाऊ शकता. डॉ. आंबेडकरांना, त्यांच्या मागण्यांना अनेकदा मुख्य प्रवाहातील माध्यमांनी टीकेचं लक्ष्य बनवलं. दलितांसाठी वेगळा मतदारसंघ मागणे म्हणजे हिंदू विरोधी, देश विरोधी आहे असं चित्र माध्यमांनी रंगवलं. आज जसं आपण वेळोवेळी वेगवेगळ्या इश्यूवर राष्ट्रीयत्वाची परीक्षा द्यावी अशी राजकीय व्यवस्थेची आणि माध्यमांची अपेक्षा असते तशी त्यावेळी काँग्रेसप्रणित माध्यमांच्या राष्ट्रीयत्वाच्या व्याख्येवर खरं उतरावं लागे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं समाजकारण, राजकारण या व्याख्येत बसत नव्हतं. महात्मा गांधी आणि डॉ आंबेडकर या दोन राष्ट्रीय पुरुषांकडे बघण्याचा माध्यमांचा दृष्टीकोन वेगवेगळ्या होता. दलित उद्धारासाठी काम करणाऱ्या आंबेडकरांना प्रसंगी भीमासुर म्हणणारी माध्यमं गांधीजींच्या 'हरिजन' संकल्पनेला डोक्यावर उचलून नाचत होती. डॉ. आंबेडकरांच्या रक्तहीन आंदोलनांना माध्यमांनी कधीच सत्याग्रह मानलं नाही. काळाराम मंदिर किंवा चवदार तळ्याच्या आंदोलनातून जो सामाजिक उत्थानाचा, न्यायाचा जो लढा उभारला गेला त्या लढ्यांच्या पायावर आजचा भारत उभा आहे. मूकनायक ते प्रबुद्ध भारत असा डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा प्रवास आहे. मूकनायकाला आवाज मिळवून देऊन प्रबुद्ध करण्याची प्रक्रीया डॉ. आंबेडकरांनी पार पाडली. त्यानंतर राज्यघटनेची निर्मिती करत असताना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुलभूत देणगी या महामानवाने दिली. तरी सुद्धा भारतीय माध्यमांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन फार बदलला नाही. आजही ६ डिसेंबरला लाखों लोक चैत्यभूमीवर गोळा होत असूनही माध्यमांमध्ये त्याचं प्रतिबिंब पडत नाही. गर्दी गोळा करायला 'नवसाला पावणारा' असं मार्केटींग करावं लागत नाही. ही आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाची, त्यांनी केलेल्या कामांची, विचारांची ताकत आहे.

डॉ. आंबेडकर यांनी सदैव मुख्य प्रवाहातील विचारधारेला आव्हान दिलं, मुख्यप्रवाहाच्या मेहरबानीवर अवलंबून न राहता वेगळा प्रवाह निर्माण केला. मुख्य प्रवाहावर दबाव निर्माण केला. आपल्या लढ्याला रक्तरंजित होऊ दिलं नाही. देश तुटू दिला नाही. तरी डॉ आंबेडकर मुख्य प्रवाह नाहीत? डॉ. आंबेडकरांच्या वाट्याला ही अवहेलना का आली असावी याचा अंदाज आपल्याला योगेंद्र यादव यांनी केलेल्या एका सर्व्हेतून लक्षात येतं. देशातील हिंदी आणि इंग्रजीतील ३१५ प्रभावशाली पत्रकारांमध्ये एकही दलित आढळून आला नाही. त्यातील ७१ टक्के पत्रकार हे उच्चवर्णीय पुरूष होते. माध्यमांवर आजही जातीविशेष चा पगडा आहे. त्यातही पुरुषांचा! डॉ. आंबेडकरांना त्याकाळी माध्यमांनी डोक्यावर का घेतलं नसेल याचा अंदाज आपल्याला यातून बांधता येतो.

डॉ. आंबेडकरांनी दिलेली जाहिरात टिळकांनी का नाकारली असेल, त्याचं उत्तरही आपल्याला आपोआप सापडेल. हे नाकारणं, जातीयवादी भूमिकेतून होते की प्रस्थापित मानसिकतेतून यावर चर्चा होऊ शकते. पण जे काही आहे, या घटनेने ही लढाई सोपी नाही याचा डॉ आंबेडकरांना जाणीव मात्र करून दिली. माध्यमांवरील वर्चस्व हे पैशाच्या ताकदीवर सुद्धा मिळवता येतं. पैशाची ताकत ज्यांच्याकडे होती किंवा आहे त्यांना आजही त्यांचा अजेंडा पुढे रेटण्यामध्ये रस आहे. त्यामुळे स्वतंत्र पत्रकारिता करत असताना आंबेडकरांनी पैसे कमवण्याकडे सुद्धा लक्ष दिलं आणि वकिली सुरू ठेवली. हा इतिहास इतक्यासाठीच उगाळणे आवश्यक आहे की, आजची स्थिती ही काही वेगळी नाही. तेव्हा माध्यमं काँग्रेसच्या प्रभावाखाली होती आज ती भाजपच्या प्रभावाखाली आहेत. तेव्हा काँग्रेसच्या राष्ट्रवादाच्या कल्पनेच्या विरोधात भूमिका घेता येत नव्हती आज भाजपच्या राष्ट्रवादाच्या कल्पनेने उच्छाद मांडला आहे. अशा वेळी डॉ आंबेडकरांनी सांगितलेला मार्ग प्रशस्त वाटतो. आपले प्रश्न मांडण्यासाठी आपली माध्यमं उभी करा. आज समाजमाध्यमाच्या (सोशल मिडीयाच्या) माध्यमातून हे करणं सोप्पं झालंय. मुख्य प्रवाहातील माध्यमांवर विसंबून राहता येणार नाही. समाजमाध्यमं, अल्टरनेट मिडीया मुख्य प्रवाहातील माध्यमांवर प्रभाव आणि दबाव निर्माण करू शकतो. समाजातल्या वेगवेगळ्या घटकांमध्ये असे 'आंबेडकरी' पत्रकार निर्माण होणे गरजेचे आहे. आपले प्रश्न, समस्यांसाठी लढणारे, आवाज उठवणारे हे प्रवाह हे 'वैकल्पिकफ-अल्टरनेट माध्यमं नसून हाच खरा मुख्य प्रवाह आहे. आंबेडकरांची पत्रकारिता आपल्याला हाच संदेश देते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सर्व शाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन

**मुंबई–** १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या शाळा आणि अध्यापक विद्यालयामध्ये विविध शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, पालक, लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांनी केले आहे.

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना तसेच नवीन पिढीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची ओळख करून देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी विविध शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेइयत्ता पहिली ते पाचवी साठी वक्तृत्व स्पर्धा, एकपात्री अभिनय (वेशभूषेसह) स्पर्धा तसेच चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर बोलतोय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रसंग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपण हे विषय असतील. वक्तृत्व आणि एकपात्री अभिनयासाठी दिलेल्या तीनपैकी कोणत्याही विषयावर तीन मिनिटांचा व्हिडिओ करून अपलोड करता येईल.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करून डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# वसा आणि वारसा महामानवांचा

१९५० ते आजपर्यंतच्या ७० वर्षाच्या कालखंडाचा विचार केल्यास असे जाणवते की, भारतातील ज्या समाजाला आम्ही हजारो वर्ष गावकुसाबाहेर ठेवलं होत त्या समाजात स्वाभिमान निर्माण होऊन राजकीय व सामाजिक वारसदार तयार झालेत. समाजाचा आवाज लोकसभे पर्यंत गेला. क्लास फोर पासून कलेक्टर, मुख्यसचिव ते राष्ट्रपदीपदा पर्यंत पोहचला. आणि हे सर्व शक्य होवू शकलं शिक्षणामुळे आणि त्याला जोड होती विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या वैचारिक व संघर्षाच्या प्रेरणेची. बाबासाहेब म्हणाले होते, "शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो प्राशन करेल तो गुर गुरगुरल्या शिवाय राहणार नाही," "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा... !" हा मंत्र बाबासाहेबांनी काय फक्त कोण्या एका समाजापुरता दिलेला नव्हता, तर तो समस्त बहुजन समाजाला (मराठा, ओबीसी, एस. सी., एस. टि.,) होता. बाबासाहेबांच्या विचारांचा खरा अर्थ मात्र कळाला इथल्या बौद्ध समाजाला आणि त्यांनी शिक्षणाची कास धरून प्रगतीचे शिखर गाठले. पुन्हा लोक धार्मिक गुलामीत खितपत पडून राहू नये म्हणून मानवतावाद, प्रज्ञा, शिल, करुणा, समता, स्वातंर्त्य, बंधुता शिकवीणारा व २५०० वर्षानंतरही जग ग्लोबलाइज झालेल्या युगातही ज्याचा विचार टिकून आहे असा बौद्ध धम्म दिला. धम्म ज्यांनी–ज्यांनी स्वीकारला ते यशाच्या शिखरावर चढले, परंतु या देशातील एका वर्गाला म्हणजे उल्लेख करायचाच झाल्यास कुणबी – मराठा, ओबीसी, शेतकरी वर्गाला असं वाटलं की बाबासाहेब यांनी यशस्वी, स्वाभिमानी होण्याचा जो मुल मंत्र दिला त्याच्याशी आपल्याला काही देण –घेण नाही, आपला काही संबंध नाही. अशी समजूत करून घेतली. गुलामीतच आनंद मानु लागला. त्याला जय ओबीसी समाजाच्या विकासापेक्षा मंदिराचा विकास अधिक म्हटत्वाचा वाटू लागला. त्याला मगुलाम आणि गुलाम करणाऱ्याचा धर्म एक नसतो, म हे समजायला बराच वेळ लागला. आज मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, या आणि अश्या अनेक परिवर्तनवादी संघटनामुळे त्याला कळत आहे की, 'आपला शत्रू कोण आणि मित्र कोण? ' ही बाब आशादायी आहे.

एप्रिल महिना हा समता पर्वाचा महिना असतो. या महिन्यात ११ एप्रिलला महात्मा फुलेंची जयंती, १४ एप्रिल बाबासाहेब आंबेडकरांची आणि ३० एप्रिलला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती असते.

इथल्या अन्यायी, अत्याचारी धर्म व्यवस्थेवर आधुनिक युगात "सर्वसाक्षी जगतपाती, त्याला नकोच मध्यस्थिं असे म्हणून हल्ला करणाऱ्या महात्मा फुलेंनी आमच्या धर्म कार्यात पैसे घेवून दलाली करणाऱ्या पुरोहितवर्गाचा निषेध केला. महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक नाते अत्यंत



जवळचे. बाबासाहेबांनी तिन लोकांना गुरु स्थानी ठेवलं. त्यापैकी एक म्हणजे महात्मा फुले. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाचा शेवट ३९५ कलमावर केला. बाबासाहेब ३९५ पेक्षा कमी–अधिक कलमावर शेवट करू शकले असते, परंतु ३९५ कलमावरच शेवट करण्याचं काय कारण असेल...? त्यामागचं कारण आहे, महात्मा फुलेंनी ज्या इमारतीतून पहिल्यांदा ज्ञान देण्याचे काम केले त्या इमारतीचा क्रमांक ३९५ होता. ज्या महात्म्याने रंजल्या – गांजलेल्याना ज्ञान देण्याचे महान कार्य केले त्यांचे स्मरण करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त म्हणून संविधानात ३९५ कलमे समाविष्ट केले. जगातील एकमेव शिष्य असेल या पद्धतीने गुरूला गुरुदक्षिणा देणारा.

**शिवाजी महाराजांच्या अपमानाचा बदला :–** या देशातिल रंजल्या– गांजल्यांना, महिलांना, कष्टकरी, शेतकरी यांना ज्या ग्रंथाने गुलाम बनविले होते आणि त्याच ग्रंथाचा आधार घेवून छत्रपती शिवाजी महाराजांना शुद्र संबोधून, त्यांच्या राज्यभिषेकाला विरोध केला होता, त्या ममनुस्मृतीफ ग्रंथाविषयी महात्मा फुले म्हणाले होते, *"ज्या दिवशी बहुजन समाज मनुस्मृती वाचेल त्या दिवसी तिला तो जाळल्याशिवाय राहणार नाही. " हे सत्यात उतरवून दाखविले बाबासाहेब आंबेडकरांनी. ज्या रायगडावर शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाला विरोध केला होता. त्याच रायगडाच्या पायथ्याशी महाड येथे २५ डिसेंबर १९२७ ला मनुस्मृती जाळून महात्मा फुलेंचा शब्द खरा करून दाखविला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अपमानाचा बदला घेणारा कोणी जर असेल तर ते आहेत डॉ बाबासाहेब आंबेडकर. महात्मा फुलेंनी छत्रपती शिवरायांना गुरु स्थानी मानून प्रेरणा घेतली होती. म्हणजे गुरूच्या गुरुचा अपमानाचा बदला घेणारा जगातील एकमेव व्यक्ती म्हणेज बाबासाहेब आंबेडकर, हे समस्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनुयायांनी समजून घेणे तसेच आपले मित्र ओळखणे सुद्धा आवश्यक आहे. या महामानवांचे गुरु बघा, नाहीतर आपले गुरु आसाराम, साईराम, रामरहिम. हे शिष्याकडे दक्षिणाही भारी मागतात, ते इथं लिहिण्यासारखं नाही आहे. आपण जानताच....

**पाण्याकरिताचा पहिला आंदोलन:–** महाड येथील चवदार तळ्याच पाणी अस्पृश्यांना पिता यावं म्हणून २० मार्च १९२७ ला माणसाला पाणी प्यायला मिळाव या करिता जगातलं पहिल आंदोलन बाबासाहेब आंबेडकरांना कराव लागलं आणि तेही भारतात, एक भारतीय म्हणून आपल्याकरिता किती दुर्दैवी गोष्ट आहे. बाबासाहेबांनी चवदार तळ्याच्या आंदोलनाकरिता १९२७ हेच वर्ष का निवडलं असावं. बाबासाहेब कोणतीही कृती करायचे त्या मागे खूप मोठ कारण असायचं. महात्मा फुलेंचा जन्म १८२७ चा आणि १९२७ ला फुलेंच्या जन्माला १०० वर्ष. म्हणजे १९२७ हे वर्ष महात्मा फुलेंचे जन्मशताब्दी वर्ष.. ज्या फुलेंनी अस्पृश्य समाजा करिता आपल्या घरातील हौदाच पाणी पिण्याकरिता मोकळ केलं, त्या कार्याला बाबासाहेबांनी पाण्याच आंदोलन करून अभिवादन केलं आणि इथल्या मनूवावाद्यांना स्मरणही करून दिल कि १०० वर्षानंतरही तुम्ही माणूस झाले नाहीत. आता तरी माणूस व्हा. किती खेदाची बाब आहे, ज्या धर्मात माणसाला पाणी पिल्या जावू देत नव्हतं आणि तेही आपल्याच धर्मातील लोकांना. असा धर्म खरंच माणुसकी जपणारा धर्म असू शकतो का..? एकवेळ मिठाविना आम्ही जगू शकू पण पाण्याविना.... कल्पनाही करवत नाही.

**शिवराय –फुले –शाहू – आंबेडकर:–** एखाद्या माणसाच महामानव व्हायला अनेक कारण असतात. त्या व्यक्तीचा त्याग आणि संघर्ष असतो तसेच त्यांना कुटुंबातून, परिसरातून, सहवासातून मिळणारे संस्कारही कारणीभूत असतात. छत्रपती शिवाजी महाराज जगलेत जिजाऊ – शहाजी च्या संस्कारात आणि संत तुकाराम महाराज व वारकरी विचारात, महात्मा फुलेंनी प्रेरणा घेतली शिवरायांच्या कार्यातून –विचारातून, शाहू महाराजांना तर स्वराज्याच्या विचारांचा आणि महात्मा फुलेंच्या सत्यशोधकी विचारांचा वारसा लाभला होता, बाबासाहेब आंबेडकरांना रामजी सुभेदारासारखा कणखर बाप आणि जोडीला बुद्ध, सम्राट अशोक, कबीर, तुकोबाराय, फुले यांचे विचार होते आणि शाहू महाराजांचा सहवास आणि साथ लाभली होती. म्हणूनच ही सर्व व्यक्तिमत्व जगाकरिता प्रेरणादायी ठरलीत. आम्ही आमच्या मुलांना घडवित आहो माझ्या नवऱ्याची दुसरी बायको, ज्यात काही पवित्र नाही अश्या अपवित्र रिश्ता सारख्या मालिका (सिरीयल) मध्ये. अंधश्रद्धा पसरविणाऱ्या आणि दैववादी बनविणाऱ्या बुवा –बापूंच्या सहवासात. आपल्याला आपल्या मुलांचं भवितव्य उज्वल बघायचं असेल तर या महामानवांचे थोडे–थोडे विचार देण्याचे धाडस करू या कारण... जे धाडस करतात, तेच जगात पुढे जात असतात, आणि पुढे जाणारे कधीच घाबरत नसतात, जे घाबरतात, ते कधीच पुढे जात नसतात...

आपणा सर्वांना फुले – आंबेडकर जन्मोत्सवाच्या मनःपूर्वक हार्दिक सदिच्छा

**अनिल भुसारी, तुमसर, जि. भंडारा ८९९९८४३९७८**

# दु:खाच्या मुलुखातील प्रकाशयात्री-डॉ.बाबासाहेब आंबेडकर

महापुरुषाचे वय कसे मोजावे?

या प्रश्नाचे उत्तर देताना श्री.म.माटे यांनी असे म्हटले होते की, "त्या महापुरुषांच्या मृत्यूनंतर समाज जितकी वर्षे त्यांची कृतज्ञतेने आठवण काढतो ते त्यांचे वय.' खरं आहे सामान्य माणसं एकदा जन्माला येतात, मृत्यूनंतर कायमची काळाच्या पडद्याआड जातात. असामान्य माणस मात्र मृत्यूपर्यंत अनंत मरणयातना भोगतात, मृत्यूनंतर आपल्या कतृत्वाने चिरंजीव होतात.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असचं चिरंजीव व्यक्तिमत्त्व, श्रेष्ठ कायदेपंडित, लोकशाही मूल्यांसाठी लढणारे तडफदार नेते, आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांची स्मृती चिरंतन राहणार आहे.

डॉ.बाबबसाहेब आंबेडकर म्हणजे देववादाला नकार. व्यक्तिस्वातंत्र्याच्या आग्रह, मानवतेची प्रतिष्ठा आणि सामाजिक गुलामगिरीचा निषेध ही बाबासाहेबांची विचारप्रणाली होती. आपल्या प्रागतिक विचाराने जगाची नव्याने मांडणी करु पाहणारा हा क्रांतीपुरुष. त्यांना प्रेरणा देणारे गुरु होते भगवान बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले तर विद्या, विनय, शील ही त्यांची दैवते होती. एक मुत्सदी राजकारणी म्हणून त्यंची एक वेगळी छाप होती. त्याचबरोबर ते एक चांगले अर्थतज्ज्ञसुद्धा होते. स्वातंत्र्य, समत, बंधुता या तत्त्वावर त्यांची अचल निष्ठा होती. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा त्यांचा दिव्य संदेश होता.

परिस्थितीवर हिमतीने मात करीत जो उत्तुंग कार्य करतो तो समाजात आदराला पात्र ठरतो. कुटुंबातील कर्त्या पुरुषाने घेतलेले अपार कष्ट आणि जाणीवपूर्वक केलेले संस्कार लेकराच्या प्रगतीसाठी प्रेरक ठरतात. रामजीबाबा हे बाबासाहेबांचे पिता. ते ज्ञानोपास होते. त्यांनी प्रसंगी कर्ज काढून लेकरांना गंथ्र पुरविले. ग्रंथनिष्ठा हा बाबासाहेबांचा व्यक्तिमत्त्व गुण होता.

डॉ.बाबासाहेबांच्या जीवनातील विविध पैलू उल्घडतांना त्यांचे "विद्याप्रेम' सर्वोच्च स्थानी आहे. ते भारताचे कयदामंत्री असताना आपल्या कामाच्या व्यापातून वेळ काढून देश–विदेशातले ग्रंथाचे आवर्जून वाचन करत असत. त्यांची ज्ञानतृष्णा लक्षणीय होती. ग्रंथवाचन आणि लेखन हा त्यांचा श्वासोच्छवास होता.

एकदा प.मदनमोहन मालवीय यांनी बाबासाहेबांना त्यांचा ग्रंथसंग्रह दोन लाख रुपयास मागितला. बाबासाहेब तडकन म्हणाले, माझ्या घरातून ग्रंथसंग्रह जाणे म्हणजे माझ्या कुडीतून प्राण जाण्यासारखे आहे. मृत्युसमयी त्यांच्या ग्रंथालयात सुमारे पंचवीस हजार दुर्मीळ ग्रंथ होते.

समाजाजागृतीसाठी डॉ. आंबेडकरांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, मधून अस्पृश्यांचे दु:ख जगाच्या वेशीवर टांगले. त्यांचा सारा लढा माणसाला माणूस म्हणून जगण्याचे हक्क मिळविण्यासाठी होता.



दीनदुबळ्या, उपेक्षित माणसांचा उद्धार हेच बाबासाहेबांचे जीवनव्रत होते. त्यासाठी त्यांनी हजारो सभा घेतल्या. आंदोलने केली. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. ते भारताच्या संविधान लेखन समितीचे अध्यक्ष झाले.

एवढे सारे करूनही, आपल्याला कोणी अवतारी पुरुष मानावे हे त्यांना मान्य नव्हते. विभूती पुजा हा लोकशाहीचा विपर्यास आहे. पुढारी लायक असेल तर त्याबद्दल प्रेम, आदर, कौतुक या भावना बाळगण्यास त्यांची हरकत नव्हती. एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे.

"केवळ माझे नाव घेऊन जयजयकार करण्यापेक्षा, जी गोष्ट माझ्या दृष्टीने अत्यंत मोलाची आहे, ती करण्यासाठी प्राणाच्या मोलाने तुम्ही झटा."

समाजातील असा एकही घटक नसेल, ज्यांचेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर झटले नाहीत. बहुजनाच्या उत्थानासाठी ते आयुष्यभर चंदनाप्रमाणे झिजत राहिले. दलित समाज आपल्या पायावर उभा राहावा. स्वाभिमानी बनावा अशी त्यांची इच्छा होती. आंबेडकर सतत लोकांना सांगत की, तुम्ही स्वयंप्रकाशित व्हा, परप्रकाशित राहू नक, स्वत:च्या बुद्धीवर विश्वास ठेवा.

ते नेहमी आपल्य चिंतनातून व्यक्त करायचे की, समाज ही एक नौका आहे. ज्याप्रमाणे आगबोटीतून प्रवास करणाऱ्याने इतरांचे नुकसान करण्यासाठी एखादे चित्र पाडले व पडलेले पाहूनही बुजवले नाही तर सर्व बोटीबरोबर त्यालाही जलसमाधी घ्यावीच लागते. कोणत्याही देशाच्या लोकसंख्येचा एखादा भाग अवनत झाल्यास त्याचा डाग राहिलेल्या भागास पर्यायाने देशात पडल्याशिवाय राहणार नाही. जोपर्यंत हा भाग हीनदीन होऊन पंगुवत पडला आहे. तोपर्यंत हा देश असाच हीनदीन राहणार यात शंका नाही.

आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना उद्देशून अनेक ठिकाणी आपले मत व्यक्त केले आहेत. ते म्हणत आयुष्य ही शर्यत आहे. त्यात भाग घेण्याचे निमंत्रण खर्वांनाच येते. त्यात उत्तीर्ण होण्याचा निर्धार करा. ज्ञान मिळवा, झगडा करा, सत्याचा आधार घ्या. सत्याशिवाय कशासाठी शरण जाऊ नका. दिव्याप्रमाणे स्वयंप्रकारी व्हा. विद्येचे महत्व जाणूनच भाररत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

"एक पोळी कमी खा, पण एक पुस्तक विकत घ्या" "वाचाल तर वाचाल"

**युवराज माने**
**९५२७७६७००३**

# रेल्वेचा पादचाची पूल अखेर सुरू

**गोंदिया:** रेल्वे प्रशासनाने कोरोनामुळे शहरातील कुडवा लाईन व पाल चौक व मुख्य मार्केट रेलटोली परिसरातील पादचारी पूल मागील दोन वर्षापासून बंद केला होता. त्यामुळे प्रवाशांना दोन किमीचा फेरा मारुन रेल्वेस्थानकावर पोहोचावे लागत होते. यामुळे बरेचदा गाडी सुद्धा सुटत होती. ह पादचारी पूल पूर्ववत सुरू करण्यात यावे यासाठी माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह चर्चा केली. त्यानंतर सोमवार (दि.११) गोंदिया रेल्वे प्रशासनाने हे पादचारी पूल पूर्ववत सुरु केले.



कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे दोन वर्षापासून हे पादचारी पूल बंद करण्यात आले होते. त्यामुळे या पादचारी पूलावरुन दोन्ही बाजूने ये–जा करणाऱ्या नागरिकांची आणि प्रवाशांची गैरसोय होत होती. हा पूल पूर्ववत सुरू क़रण्यासंदर्भात रेल्वे सल्लागार समितीचे जसपालसिंह चावला व सदस्यांनी सुद्धा पाठपुरावा केला होता. माजी आ.गोपालदास अग्रवाल यांनी मागील आठवड्यातय दिल्ली येथे गेले असता केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन या मुद्यावर त्यांच्यासोबत चर्चा केली होती.

यानंतर रेल्वे मंत्री वैष्णव यांनी हा पूल सुरु करण्यासंदर्भात निर्देश दिले. सोमवारी हा पूल सुरु करण्यात आल्याने प्रवासी व शहरवासीयांना दिलासा मिळाला आहे.

**रेल्वे डेली मुव्हर्स असोसिएशनने दिला होता आंदोलनाचा इशारा**

शहरातील कुडा लाईन व पाल चौक व मुख्य मार्केट रेलटोली परिसरातील पादचारी पूल त्वरित सुरु करण्यात यावा, यासाठी गोंदिया रेल्वे डेली मुव्हर्स असोसिएशन व वृत्तपत्र विक्रेता संघटनेने मंगळवार (दि.१२) कॅंडल मार्च काढण्याचा इशारा दिला होता. त्यापुर्वीच हा पादचारी पूल सुरु झाल्याने आता मंगळवारी विजयी कॅंडल मार्च काढणार असल्याचे गोपाल अग्रवाल यांनी सांगितले.

# ज्योतिराव फुले: सामाजिक चळवळीचे प्रणेते



सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतिराव फुले यांचे स्थान एकूणच मानवी जीवनाच्या इतिहासामध्ये अजरामर झालेले आहेत. त्यांनी केलेले कार्य आणि मानवतावादी दृष्किोनातून आयुष्यभर केलेली सामाजिक परिवर्तनाची साधना यामुळे महात्मा जोतीराव फुले यांना खऱ्या अर्थाने 'महात्मा' बिरुदावली शोभून दिसते. महात्मा फुले संपूर्ण हयातभर कार्य करत असताना अनेक प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले तसेच अनेक प्रसंगी त्यांना अनेक मानसन्मान प्राप्त झाला त्यांच्या हयातीत ह्या घटना त्यांचे अवघे आयुष्य कनकाप्रमाणे तेजस्वी करणाऱ्या ठरल्यास, परंतु त्यांच्या पश्चात देखिल सामाजिक चळवळीच्या शिलेदारांना आणि एकूणच मानवी समाजाला त्यांचे जीवन प्रेरणादायी ठरणाऱ्या या घटना मानवी इतिहासाची प्रचंड समृद्धी संपन्नता देणाऱ्या होत.

महात्मा फुलें यांचे असंख्य चाहते आणि त्यांना काळजात जपणारे तपस्वी अभ्यासक आहेत. प्रसिद्ध संशोधक आणि चरित्रकार धनंजय कीर यांच्या 'महात्मा जोतिराव फुले' या ग्रंथातील त्यांच्या कार्याचा गुणगौरव करणारा एक हृदयस्पशी प्रसंग या ठिकाणी मुद्दाम द्यावासा वाटतो.

"जोतीबांच्या गौरवार्थ विश्राम बागवाड्यात १९ नोव्हेंबर १८५२ रोजी सरकारने देशी सर्व सरदार आणि प्रमुख लोक यांची सभा बोलावली होती. समारंभाच्या प्रारंभी मेजर कँडी यांनी सरकारी शिक्षा मंडळीचे निवेदन सभेकडे वाचून दाखवले आणि नंतर सभेचा उद्देश मराठीत कथन केला. भाषणाच्या शेवटी त्यांनी सरकारच्या वतीने जोतिबांना एक शालजोडी (दोनशे रुपये किमतीची) सन्मानपूर्वक अर्पण केली."

जोतिरावांचा हा सन्मान अनेक अर्थाने ऐतिहासिक होता, कारण स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या शिक्षणासाठी झटणारा पहिला भारतीय पुरुष म्हणून जोतीरावांची उंची त्यामुळे उत्तुंग हिमालयाएवढी झाली. ज्या धर्मग्रंथांनी व चातुर्वर्ण्यव्यवस्थेने स्त्रीशूद्रातिशूद्रांना शिक्षणबंदी घालून पशुवत जीवन जगण्यास बाध्य केले, त्याविरोधात उभे राहून शिक्षणाचा ओनामा रचणे म्हणजे हिमालयाप्रमाणे वादळवारे अंगावर घेण्यापेक्षाही भयंकर दिव्य होय. ते जोतिरावांनी झेलले, किंबहुना त्यापेक्षाही कठोर प्रसंग आणि जाच जोतीराव सहन करत ही शिक्षणाची गंगा सर्वसामान्यांपर्यंत कशी पोहोचेल या ध्येयाने झपाटले होते. पण ज्यांच्यासाठी प्रयत्न चालू होते त्यांना त्याची फारशी जाणीव असण्याचे कारण नव्हते. इंग्रजी अमदानीत शिक्षणव्यवस्थेत असणाऱ्या अधिकाऱ्यांना मात्र या कार्याचे महत्त्व किती वाटत होते आणि ऐतदेशीयांपेक्षा आंगलादेशीच्या गोऱ्या भावंडांना या देशातील लोकांच्या शिक्षणाबद्दल ज्योतिरावांची भूमिका कशी वाटत होती त्याचे प्रत्यंतर देणारी ही घटना सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने फार महत्त्वाची घटना होय.

त्या काळात सामाजिक कार्य करणे अतिशय कठीण होते कारण पेशवाईचा अंत होऊन पेशवाईची खुमखुमी अजून जिरली नव्हती, पण जोतीरावांनी विरोधाची तमा न बाळगता प्रयत्नांची पराकाष्ठा केली त्याबद्दल कीर म्हणतात, "मुलींच्या शाळा काढून जोतिरावांनी स्त्री शिक्षण क्षेत्रात जे प्रचंड कार्य केले होते त्याविषयी हा त्यांचा सत्कार झाला होता. त्यांच्या ज्या मित्रांनी त्यांना धैर्याने पाठिंबा दिला होता त्यांच्या जीवनातील हा एक सोन्याचा दिवस होता. हिंदी स्त्रियांच्या शिक्षणाच्या इतिहासातील हा एक सुवर्ण दिन होता एकोणिसाव्या शतकातील भारतातील शैक्षणिक इतिहास काही व्यक्तींच्या नावाशी निगडित झालेला आहे, असे सर हेन्री शार्प यांनी यथार्थपणे म्हटले आहे. त्या व्यक्ती म्हणजे डेव्हिड हॅरे, राम मोहन राय, विल्यम कॅरे प्रभुती होत. जोतिराव फुले हे त्यांच्यापैकी एक होते. स्त्रियांच्या हक्कासाठी, उद्धारासाठी त्याग करणाऱ्या आणि कष्ट भोगणाऱ्या ज्योती रावांचा 'स्त्रियांचा उद्धारकर्ता' म्हणून सत्कार झाला, त्यावेळी न्यायमूर्ती माधवराव रानडे हे दहा वर्षाचे होते. प्रतिगाम्यांचे शंकराचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस आलेले विष्णुशास्त्री चिपळूणकर हे दोन वर्षाचे होते. सामाजिक चळवळीचे कैवारी गोपाळ गणेश आगरकर, स्त्रियांच्या विद्यापीठाचे संस्थापक धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई आणि महात्मा गांधी सेवा जन्मास आलेले नव्हते.

स्त्रियांचा शैक्षणिक इतिहास अर्थात, महात्मा जोतीराव फुले यांच्या देदीप्यमान कामगिरीने प्रारंभ होतो हे विशद करणारी ही टिप्पणी खऱ्या अर्थाने जोतिरावांचे महात्म्य लोकाभिमुख करणारी होय. जोतिरावांनी सामाजिक परिवर्तनासाठी स्त्रीशिक्षण किती प्राधान्याने घ्यायचे हे दाखवून दिले पण ते त्याच ठिकाणी थांबले नाही, रमलेही नाही. स्त्रीशूद्रातिशूद्र यांच्या सर्व अनर्थाचे कारण अविद्या आहे, तिची चिरफाड करतात. आणि या देशातील उच्च जात वर्ण समाज धर्म यांची चिकित्सा करून मानव मुक्ती लढा त्यांच्या साहित्यकृतीतून सशक्त करतात.

या देशातील जात–वर्णव्यवस्थेविरोधातील, आर्यभटाच्या अन्याय्य धम 'ग्रंथविरोधातील लढ्याचे लढवय्यांचे अनेक दाखले उदाहरणे जोतिराव फुले व्यासंगपूर्ण मांडणीतून देतात. आणि शूद्रातिशूद्रांची सांस्कृतीक प्रतीके बळीराजा–खंडोबा–ज्योतिबा पासून कृषी संस्कृतीशी साधर्म्य पावणारी श्रमिकांच्या जीवनाशी त्यांचे साहचर्य दाखवून देतात. या सांस्कृतिक लढ्यात खऱ्या अर्थाने न्याय लढा आहे. खरा शोषक जाणून घेता येऊ शकतो, हा आत्मविश्वास देऊन ख्रिस्ती महंमदी आणि बुद्धपरंपरेतील समतेची प्रतीके या लढ्यात सहाय्यभूत ठरणारे आहेत, याची ज्योतिराव वारंवार मांडणी करतात. त्या समग्र मांडणीला, कार्याला संस्थात्मक पद्धतीने समाजाकडे हस्तांतरित करण्यासाठी मग २४ सप्टेंबर १८७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना करतात. आणि सार्वजनिक जीवनातील एक महत्त्वाची ही घटना जोतीरावांच्या एकुणच जीवनाचा सार आणि कार्याची दिशा स्पष्ट करणारी ठरते.

शूद्रातिशूद्रांना ज्या भट भिक्षुकांनी अमानवी जीवन जगण्याची एक प्रकारे शिक्षा दिली त्यांचे पौरोहित्य नाकारून अनेक ठिकाणी शूद्रातिशूद्र मंगल प्रसंग पार पाडू लागले. ह्यामागे शोषकांच्या बद्दल त्यांनीच शूद्रातिशूद्रांवर लादलेला पूज्यभाव त्यागून मनपरिवर्तन करणे ही महत्त्वाची भूमिका होती. पौरोहित्य नाकारणे म्हणजे ब्राह्मण्य नाकारणे, जातीयता नाकारणे होय. आणि डिकास्ट होण्यासाठी ही प्रक्रिया खूप मूलभूत समजली पाहिजे. जोतिरावांच्या या झंझावातापुढे प्रभिक्षकवर्ग तोंडघशी पडत गेला आणि बहुजन समाजात चैतन्य येऊ लागल्याने या विचाराच्या समर्थकांची संख्या पटीत वाढू लागली. जोतीरावांच्या पश्चातही ही कार्ये अनेक वर्ष चढ उतारासह होत आहे. वर्तमान परिस्थितीतही सांस्कृतीक लढे मुख्यतः जोतीरावांच्या विचारधारेवर आधारित गतिमान आहेत. याचे ईप्सित जोतीरावांच्या दूरदृष्टीत दिसून येते. भारतीय समाजाचे नीटपणे केलेले विश्लेषण आणि परिवर्तनाची अचूक दिशा जोतीरावांच्या जीवन– कार्य–विचारातून स्पष्ट होते हा विश्वास अनेक पिढ्यांसाठी फलदायी ठरणारा वाटत आहे.

जोतीरावांच्या कार्याचा गौरव सांगणारी एक घटना किती लोकांना प्रेरणादायी ठरू शकते. त्या कार्याचे महत्त्व लोकांना पटवून देऊ शकते. खुद्द ज्योतिरावांना विश्वास अन आत्मविश्वास देऊ शकते. याचा विचार धनंजय कीरांसारख्या असंख्य ज्ञान तपस्वींना मोलाचा वाटत असल्याने साहित्यातील साधना पिढ्यानपिढ्या लोकोपयोगी ठरते, त्याचप्रमाणे सामाजिक चळवळी आणि एक एक कार्यकर्ता समाजोपयोगी ठरत असतात. हे स्पष्ट होते.

**अनुज हुलके**

# रेल्वे समस्यांचा पाढा वाचला दिल्ली दरबारी

## खासदार मेंढे यांची मंत्र्यांशी चर्चा : लवकरच बैठक घेवून काढणार मार्गी



### या मागण्याही कराव्या पूर्ण

**सुरू असलेल्या काही पॅसेंजर गाड्या आणि नवीन गाड्यांना थांबा देण्याच्या अनुषंगानेही या निवेदनात मागणी करण्यात आली आहे. गोंदिया इतवारी स्टेशन दरम्यान पाच पॅसेंजर गाड्या धावत होत्या. आज एक धावते आहे. गोंदिया दुर्ग दरम्यान चालणाऱ्या सहा गाड्यांपैकी दोन गाड्या धावत आहे. गोंदिया – चंद्रपूर चार पैकी दोन, गोंदिया कटंगी आठ पैकी पाच अशा गाड्या सुरु आहेत. यापूर्वी प्रमाणे पूर्ण फेऱ्या चालविण्यात याव्या अशी मागणी करण्यात आली आहे. शालिमार, पुरी एलटीटी या गाड्यांना भंडारा–गोंदिया येथे दरभंगा एक्सप्रेस, गया चेन्नई गाड्यांना सौंदड आणि अर्जुनी मोरगाव स्थानकावर थांबा देण्यात यावा तसेच हरिद्वार जबलपूर एक्सप्रेस गोंदिया पर्यत विस्तारित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. गोंदिया ते प्रयागराज गाडी बालाघाट मार्गाने चालविण्यात यावी या मागणीचा ही समावेश खासदारांनी दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे.**

**गोंदिया:** भंडारा– गोंदिया लोकसभा मतदारसंघातील रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करून प्रवाशांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून द्याव्या. बंद असलेल्या पॅसेंजर गाड्या सुरू करून नवीन काही एक्सप्रेस गाड्यांचे थांबे भंडारा आणि गोंदिया येथे देण्याच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात यावे अशा आशयाचे निवेदन खासदार सुनील मेंढे यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना भेटून दिले.

विशेष म्हणजे भंडारा गोंदिया रेल्वे स्थानकाच्या अनुषंगाने असलेल्या समस्या सोडविण्यासाठी विस्तारित बैठक घेण्याची मागणी खासदारांनी केल्यानंतर प्रतिसाद देत लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन मंत्रिमहोदयांनी दिले आहे. दिल्ली येथे खासदार सुनील मेंढे यांनी मंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान गोंदिया आणि भंडारा रेल्वे स्थानकाच्या अनुषंगाने विविध मागण्यांचे निवेदन दिले..

१८७८ मध्ये गोंदिया रेल्वे स्थानकाची निर्मिती झाली. ७ प्लॅटफॉर्म असलेले हे रेल्वे स्थानक दिल्ली ते चेन्नई यांच्यातील अंतर २५० किलोमीटर ने कमी करण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात आले होते. नागपूर ते तुमसर लाईनचे उद्घाटन १८८० मध्ये करून १९८८ मध्ये सामान्य जनतेसाठी खुली करण्यात आली. ज्या सात रेल्वे स्थानकांचा कोड हा केवळ अक्षरासोबत आहे. त्यापैकी गोंदिया हे एक असून अ वर्गवारीत मोडणारे स्टेशन आहे. गोंदिया रेल्वे स्थानकाच्या उत्तर दिशेला असलेले द्वार, तिकीट घर, अत्याधुनिक सुविधायुक्त प्रतीक्षालय, अतिक्रमित जागेत असलेली पार्किंग सुविधा आणि गुड हाऊस हे स्थानांतरित करून गोंदिया एमआयडीसी परिसरात मुंडीपार येथे तयार करण्यात यावे. या ठिकाणी प्लॅटफॉर्म क्रमांक–८ ची निर्मिती केली केली जावी व हा सर्व परिसर अत्याधुनिक एक सोयी सुविधांनी युक्त असा करण्यात यावा अशी मागणी खासदारांनी केली. रेल्वे स्थानकाच्या पश्चिम दिशेला असलेल्या तलावाचे सौंदर्यीकरण करून बोटिंग पार्क तयार करण्यात यावे, अशी मागणी केली.

# 'कॅच द रेन' मोहिमेचा सर्वकष आराखडा तयार करा- जिल्हाधिकारी नयना गुंडे

●पावसाचं पाणी साठवा●तलाव क्षेत्र मोजणी करा●नाविन्यपूर्ण कामे घ्या



**गोंदिया :** केंद्र शासन पुरस्कृत जलशक्ती अभियान कार्यक्रमांतर्गत 'कॅच द रेन' मोहीम जिल्हाभर राबविण्यात येणार असून कार्यान्वित यंत्रणांनी या मोहिमेचा सर्वकष आराखडा तयार करावा. छतावरील पाऊस पाणी संकलन, विहीर पुनर्भरण, मामा तलावातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, तलाव अतिक्रमण मुक्त करणे या सोबतच नाविन्यपूर्ण काम करण्यावर भर देण्यात यावा अशा सूचना जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. उपवनसंरक्षक कुलराज सिंह, उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनंत जगताप, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण, वरिष्ठ भु–वैज्ञानिक एस. एस. खोडे, सत्यजित राऊत व अधिकारी उपस्थित होते.

जलशक्ती अभियान कार्यक्रमांतर्गत 'कॅच द रेन' मोहीम राबविणे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट हे अस्तित्वातील रेन वाटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चरची दुरुस्ती करून पावसाच्या पाण्याची साठवण करणे हे आहे. नवीन कृत्रिम स्ट्रक्चर तयार करणे, विद्यमान तलाव आणि जल स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे, पावसाळा सुरू होण्यापूर्वी नद्यांचे पुनरुज्जीवन करणे या व्यतिरिक्त जिल्ह्यातील सर्व जलाशयांचे जिओ टॅगिंग करून माहिती गोळा करून या योजनेअंतर्गत नियोजन करण्यात येणार आहे.

रेन वाटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चरच्या बांधकामाद्वारे व दुरुस्तीद्वारे जास्तीत जास्त पाणी साठवणे यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. या मोहिमेचा आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्य सचिवांनी यापूर्वी झालेल्या दुरदृश्य प्रणाली बैठकीत दिले होते. त्या अनुषंगाने आज आढावा घेण्यात आला.

जिल्ह्याचा आराखडा तयार करतांना सिंचन विभाग, कृषी विभाग व वन विभागाकडे अस्तित्वात असलेल्या जल स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यास प्राधान्य देण्यात यावे असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. गोंदिया जिल्हा हा माजी मालगुजारी तलावांचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. बरेच तलाव अतिक्रमीत झाले असून 'कॅच द रेन' मोहिमेच्या अनुषंगाने तलाव क्षेत्र मोजणी व अतिक्रमण मुक्त तलाव मोहीम राबविण्यात यावी असे त्यांनी सांगितले. तलावातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, विहीर, कुपनलिका पुनर्भरण पाणी अडवा, पाणी जिरवा या सारखे उपक्रम राबविण्यात यावेत.

सर्व शासकीय इमारतीच्या छतावरील पाऊस पाणी संकलन करण्यावर भर देण्यात यावा. नवीन रहिवाशी इमारत बांधकाम परवानगी देतांना छतावरील पाऊस पाणी संकलन अनिवार्य करण्यात यावे अशा सूचना त्यांनी दिल्या. यासोबतच 'कॅच द रेन' मोहिमेत नाविन्यपूर्ण कामे घेण्यात यावीत. या मोहिमेत लोकसहभाग वाढवावा असेही त्या म्हणाल्या. आराखडा सर्वकष व परिपूर्ण करण्यावर भर द्यावा असे त्यांनी सांगितले. या मोहिमेचे नोडल अधिकारी जिल्हा जलसंधारण अधिकारी आहेत.

# समाजाला विकासाची गती देण्यात महीलांचे मोठे योगदान- पंकज रहांगडाले




**गोरेगाव:**– तालुक्यातील सोनी येथे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अतंर्गत एकता प्रभाग संघ, सोनीच्या वतीने "महीला मेळावा व वार्षीक सभेचे" उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य पंकज रहांगडाले यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी सिताबाई रहांगडाले होत्या. तर पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्य किशोर पारधी, शशीबाई पुन्डे, पोलीस पाटील आशाबाई बोपचे, ललिताबाई पुन्डे, उमेद तालुका अभियान व्यवस्थापक जितेंद्र बिसेन, राहुल बोपचे, आरती बावनकर प्रभाग समन्वयक, लक्ष्मीप्रसाद बारापात्रे, सरिताबाई पुन्डे, ममताबाई पटले, ममताबाई टेभंरे, पियुष बघेले ग्रा.प.सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलतांना जि.प.सदस्य पंकज रहांगडाले यांनी महिलांच्या विकासाची व शौर्याच्या गौरवगाथा सागंत राष्ट्राच्या विकास घडविण्यात महीलांचा सिंहाचा वाटा असुन महिलाशक्ती ही राष्ट्र शक्ती आहे. समाजाला विकासाची गती देण्यात महीलांचे मोठे योगदान असल्याचे विचार व्यक्त केले.या कार्यक्रमात एकता प्रभाग संघ, सोनीच्या महीलांनी सेंद्रीय शेती करुन विविध भाजीपाल्याचे स्टॉल लावण्यात आले होते. सोनी, नोनीटोला, बोटे, दवडीपार, झांजिया, मोहगाव येथील सर्व बचत गटातील महीला उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन सौ. भुमेश्वरीबाई पुन्डे यांनी केले तर आभार कटरे यांनी मानले.

# खा.पटेलांच्या तक्रारीला दोन महिने लोटूनही कारवाई शुन्य

■ तक्रार फेब्रुवारीत अन कारणे दाखवा मार्चच्या शेवटी

■ मुख्यमंत्री कार्यालयासह ग्रामविकास मंत्रालयाचेही याप्रकरणाकडे दुर्लक्ष

**गोंदिया :** जिल्हा परिषदेत मागील दोन वर्षांपासून प्रशासकराज सुरू असून याचा पुरेपूर फायदा काही अधिकारी करून घेत आहेत. सर्वसाधारण सभेची मंजुरी न घेता व आपल्या वरिष्ठांना विश्वासात न घेता जिल्हा परिषद पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आर.एल.पुराम यांनी १५ व्या वित्त आयोगाच्या १० कोटी ३१ लाख रुपयांच्या कामांचे नियोजन केले. याची तक्रार खुद्द खासदार प्रफुल्ल पटेल यांनी १२ फेब्रुवारीला ग्राम विकास मंर्त्यांना केली होती. त्या तक्रारीवर लगेच चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश ग्रामविकास मंर्त्यांनी दिले होते, मात्र जिल्हा परिषदेने ही तक्रार गांर्भियाने न घेता वेळ काढू धोरण अवलंबले होते.



जा.क्र.ग्रामविकास व कामगार/...

प्रफुल पटेल

संसद सदस्य (राज्यसभा) महाराष्ट्र

१२ फेब्रुवारी २०२२

गोंदिया/फेब्रुवारी/११०७२/२०२२

प्रति,
मा. ना. श्री हसन मुश्रीफजी,
मंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई.

महोदय,

श्री सुरेश हर्षे, जि. प. सदस्य, गोंदिया यांच्या संलग्न निवेदनानुसार १५ व्या वित्त आयोगातील १० टक्के निधीतून (जि.प. स्तर) सन २०२०-२१ ला एकूण १०,३५,५६,०००/- रुपयांच्या विकास आराखड्याला मंजूरी प्रदान करण्यात आली. परंतु येथील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, गोंदिया यांनी नियोजन समिती, सर्वसाधारण सभा व स्थायी समितीची मंजूरी न घेता सदर कामे मंजूर केलेली आहेत. तसेच दुसऱ्या योजनेत मंजूर झालेल्या कामांचा समावेश या कामांमध्ये करण्यात आला असून स्वमर्जीने कामांना मंजूरी देऊन शासकीय निधीचा गैरवापर केल्याची तक्रार संलग्न निवेदनातून करण्यात आलेली आहे. तसेच यासंदर्भात मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर आणि मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गोंदिया यांचेकडे सुद्धा तक्रार करण्यात आलेली आहे.

तरी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जि. प. गोंदिया यांनी उपरोक्त कामांत निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी सखोल चौकशी करुन मंजूर केलेल्या कामांना त्वरीत रद्द करण्याचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., गोंदिया यांना निर्देश देण्यात यावे, ही विनंती.

धन्यवाद.

आपला,

प्रफुल पटेल



त्यानंतर परत माहिती अधिकार कार्यकर्त १ मार्च रोजी आणि तशीच तक्रार २८ मार्च रोजी ईमेलव्दारे मुख्यमंर्त्यांना झाल्यानंतर हे प्रकरण अंगावर लक्षात येण्याचे चिन्ह दिसताच २८ मार्चला सायकांळच्या सुमारास उपमुकाअ पुराम यांना कारणे दाखवा पत्र देत दोन दिवसांत उत्तर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

जिल्हा परिषदेला १५ व्या वित्त आयोगांतर्गत विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो . उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना १० लाख रुपयांपर्यंतच्या कामांना मंजुरी देण्याचे अधिकार आहे.

यापेक्षा अधिकच्या निधीची कामे मंजूर करताना मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. मात्र, या कामासाठी सर्वसाधारण सभेची मंजूरी घेण्यातच आली नव्हती.

गोंदिया जिल्हा परिषदेत मागील दोन वर्षांपासून प्रशासकराज सुरू आहे. हे त्यामुळे याचा काही अधिकारी फायदा घेत आहेत. पंचायत विभागाचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी आर.एल. पुराम यांनी १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त झालेल्या निधीपैकी १० कोटी ३१ लाख रुपयांच्या कामांचे नियोजन जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी यांना विश्वासात न घेता तसेच सर्वसाधारण सभेची मंजुरी न घेता केले होते.

ही बाब जिल्हा परिषद सदस्य सुरेश हर्षे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी यावर आक्षेप घेत याची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, खासदार प्रफुल पटेल व ग्रामविकास मंत्रालयाकडे केली होती. तेव्हा जिल्हा परिषदेने निधी खर्च झालाच नाही. केवळ नियोजन केले असे सांगत सारवा सारव करण्याचा प्रयत्न केला होता.त्यानंतर या प्रकरणी कुठलीच कारवाई केली नव्हती. या नंतर खासदार प्रफुल्ल पटेल यांनी ग्रामविकास मंत्र्याकडे पत्रव्यवहार केल्यानंतर जिल्हा परिषदेने कारवाई करण्यासाठी हालचाली सुरू केल्या.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हा परिषद अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंड यांची नियुक्ती केली. पुंड यांनी २८ मार्च रोजी आर.एल. पुराम यांना कारणे दाखवा नोटीस देत दोन दिवसांत यावर खुलासा सादर करण्यास सांगितले. पुराम यांनी आपले म्हणणे अतिरिक्त मुकाअ श्रीमती पुंड यांच्या समोर मांडल्याची माहिती असून आता मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकरणी काय कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे.

### प्रशासक राजमुळे मोकळीक

**आधी कोरोनामुळे आणि आता ग्रामविकास विभागाच्या निर्देशाअभावी जिल्हा परिषद पदाधिका?्यांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेत मागील दोन वर्षांपासून प्रशासकराज सुरू आहे.हे या मुळे अधिकाऱ्यांना पूर्णपणे मोकळीक मिळाली असून काही अधिकारी याचा पुरेपूर उपयोग करून घेत असल्याचे चित्र आहे.**


## कार्यालय
## ग्रामपंचायत परसोडी/रै

**पंचायत समिती-अर्जुनी/मोर** **जिल्हा परिषद-गोंदिया**

Email ID-pursodiraigp@rediffmail.com

## निविदा सुचना

निविदा क्रमांक–०१ जा.क्र.ग्रा.प.परसोडी २०/२०२२ दि.०९/०४/२०२२

ग्रामपंचायत परसोडी/रै, पंचायत समिती अर्जुनी/मोर जिल्हा गोंदिया येथे **जनजीवन मिशन, १ वा वित्त आयोग व स्वच्छ भारत मिशन** अंतर्गत खालील प्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | गावाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | सार्वजनिक शौचालय बांधकाम | परसोडी/रै | ३०००००/– | ५००/– | ३०००/– |
| २. | घनकचरा व्यवस्थापन | परसोडी/रै | ७९५७०/– | ५००/– | ७९५/– |
| ३. | घनकचरा व्यवस्थापन | परसोडी/रै | २८२५३४/– | ५००/– | २८३५/– |
| ४. | घनकचरा व्यवस्थापन | चान्ना/कोडका | ११०१९४/– | ५००/– | ११०१/– |
| ५. | घनकचरा व्यवस्थापन | चान्ना/कोडका | २५५३८१/– | ५००/– | ३०००/– |
| ६. | सार्वजनिक शौचालय बांधकाम | चान्ना/कोडका | ३०००००/– | ५००/– | ३०००/– |
| ७. | घनकचरा व्यवस्थापन | पांढरवाणी/माल | ७२३६०/– | ५००/– | ७२३/– |
| ८. | घनकचरा व्यवस्थापन | पांढरवाणी/माल | १६३४०७/– | ५००/– | १६३४/– |
| ९. | सार्वजनिक शौचालय बांधकाम | खोली | ३०००००/– | ५००/– | ३०००/– |
| १०. | घनकचरा व्यवस्थापन | खोली | ४८२४०/– | ५००/– | ४८२/– |
| ११. | घनकचरा व्यवस्थापन | खोली | १०३४८३/– | ५००/– | १०३४/– |
| १२. | घनकचरा व्यवस्थापन | पांढरवाणी/रै | ३९२५०/– | ५००/– | ३९२/– |
| १३. | घनकचरा व्यवस्थापन | पांढरवाणी/रै | १५४१४९/– | ५००/– | १५४१/– |

१) वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दिनांक ०९/०४/२०२२ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक १७/०४/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालय परसोडी/रै येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल. व निविदा विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल.

२) सदर कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ०९/०४/२०२२ ते १७/०४/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालय परसोडी/रै येथे स्वीकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरण्याची पावती मिळेल.

३) मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक १८/०४/२०२२ ला ग्रामपंचायत कार्यालय परसोडी/रै येथे दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येईल.

४) सदर कामाची तपशीलवार संपुर्ण, माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केलेली आहे.

**श्री.पी.आर.चव्हाण**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत परसोडी/रै**

**सौ.रंजना आत्माराम वाडगुरे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत परसोडी/रै**



# आठवडाभरापासून महसूल कर्मचाऱ्यांचा संप

## पालकमंत्र्यांना दिले निवेदन, संपाचा परिणाम होणार कामकामाजावर



**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना यांच्या मागील एक महिन्यांपासून सुरु असलेल्या बेमुदत संपाच्या अनुषंगाने संपाचे चौथा टप्प्यांमध्ये ४ एप्रिल पासून बेमुदत संप सुरु करण्यात आला. या संपाला आठवडा उलटला असला तरी मागण्या मान्य झाल्या नाही. या संपामुळे महसूल विभागाचे कामकाज ठप्प झाले आहे. याचा विपरीत परिणाम जनमाणसांवर होत आहे.

आठव्या दिवशी देखील महसूल कर्मचाऱ्यांचा संप सुरु आहे. संपामुळे राज्याप्रमाणे जिल्ह्यातील देखील शेतकरी तसेच विद्यार्थ्यांचे दैनंदिन महसूल विभागाशी संबंधित कामकाज हे काम प्रलंबित असून त्याचा परिणाम जण माणसांवर देखील पहायला मिळत आहे.

११ एप्रिल २०२२ रोजी गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री प्राजक्त तनपुरे हे गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आढावा घेण्यासाठी ते आले असताना त्यांना महसूल कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मागण्याविषयी निवेदन देण्यात आले. मागण्या तत्काळ पूर्ण न झाल्यास यापुढे देखील सदरील संप आणखी तीव्र करण्यात येईल असा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष आशिष प्र.रामटेके यांनी दिला आहे.

निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आशिष रामटेके, कार्याध्यक्ष मुकुंद तिवारी, मध्यवर्ती संघटनेचे सचिव लीलाधर पाथोडे, आकाश चव्हाण, किशोर राठोड, विठ्ठल राठोड, आबिद पठाण, आनंद बोरकर, अविनाश घडोले, पी.झेड. बिसेन, सुधीर रहांगडाले, राजेश भोंगाळे, सारिका बन्सोड, भारती चव्हाण, माधुरी मेश्राम, अश्विनी पवार, कांता साखरे यांचा समावेश होता.

**महसुल कर्मचारी संपावर असल्याने पालकमंत्री यांच्या आढावा बैठकीत चहापानाच्या व्यवस्थेसह इतर कामासाठी जिल्हा परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची मदत घेण्यात आली.तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात आली.**

**एकीकडे गोंदिया जिल्ह्यातील महसूल कर्मचारी हे रिक्त पदे भरण्यासाठी आंदोलन करीत असतानाच जिल्ह्यातील महसूल विभागातील २० कर्मचारी वर्षानुवर्ष एकाच कार्यालयात कार्यरत आहेत. त्यापैकी १९ कर्मचारी हे त्यांच्या नियुक्तीच्या तारखेपासूनच आपल्या मुळ जागेवर नौकरी न करता सेवा सलंग्नेतेवर कार्यरत आहेत. त्यामुळेही तहसिल व उपविभागीय कार्यालयातील कामाचा व्याप इतरांवर वाढलेला आहे.**

### शासन निर्णयालाही जिल्हाधिकारी कार्यालयाचा ठेंगा

**महसुल अधिनियमात मंडळ अधिकारी जो असले त्यास कार्यालयातील कामाची माहिती व्हावी यासाठी ३ वर्ष अव्वल कारकूनचे तर अव्वल कारकुनला ३ वर्ष मंडळ अधिकारीचे काम कार्यालयाबाहेर फिल्डवर जाऊन करण्याचा शासन निर्णय आहे.या शासन निर्णयाची अमलबजावणी राज्यातील बहुतांश जिल्हाधिकारी कार्यालयात केली जाते,मात्र गोंदिया जिल्ह्यात अद्यापर्यंत या शासन नियमाची अमलबजावणीच करण्यात आली नसल्याची माहिती सुत्रांनी दिली.**

# देवरीच्या विकासाला इको सेन्सेटिव्ह झोनची आडकाठी

## एमआयडीसीने अधिग्रहित केली जमीन : व्याघ्र प्रकल्पाने रोखली गती

**गोंदिया:-** देवरी तालुक्यातून राष्ट्रीय महामार्ग ६ वर आहे. त्यामुळे या तालुक्याचा ॲद्योगिक विकास शक्य आहे. परंतु, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला लागून हा भाग असल्यामुळे येथे औद्योगिकरणाला खीळ बसली आहे. महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाने उद्योगांसाठी जागा अधिग्रहित करून देखील ती जागा निरुपयोगी ठरत आहे.



देवरी तालुका जंगलव्याप्त आणि नक्षलग्रस्त आहे. परंतु, या तालुक्यातून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा गेल्यामुळे या तालुक्याला विकासाची संधी आहे. तालुक्याचा औद्योगिक विकास होवून स्थानिकांना रोजगार मिळावा, या उद्देशाने देवरी येथे १९८९ मध्ये औद्योगिक क्षेत्राची स्थापना करण्यात आली. त्याकरिता तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्या. त्या भूखंडावर काही उद्योजक उद्योग उभारण्यास देखील इच्छुक आहेत. मात्र नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प इको सेन्सेटिव्ह झोनध्ये टाकण्यात आले. देवरी तालुक्याचा भाग देखील सेन्सेटिव्ह झोनमध्ये येतो. परिणामी येथे उद्योग थाटण्यात अडचण निर्माण होत आहे.

एकीकडे शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करून त्यांना भूमिहीन करण्यात आले. तर दुसरीकडे अधिग्रहण करण्यात आलेल्या जागेवर उद्योग देखील स्थापन करण्यात आले नाही. त्यामुळे तो खटाटोप निरर्थक ठरला. आधीच जंगलव्याप्त, दुर्गम आणि नक्षलग्रस्त तसेच बेरोजगारी असलेल्या तालुका सेन्सेटिव्ह झोनमध्ये गेल्यामुळे तालुक्यातील रोजगाराच्या आशा मावळल्या आहेत.

### खासदार मेंढे, आमदार फुकेंचे प्रयत्न

**देवरी तालुका इको सेन्सेटिव्ह झोनमधून काढून त्याठिकाणी असलेल्या भूखंडावर उद्योग थाटण्यात यावे, अशी मागणी आमदार परिणय फुके यांनी खासदार सुनिल मेंढे यांच्याकडे केली होती. ही रास्त मागणी लक्षात घेता खासदार सुनिल मेंढे आणि आमदार परिणय फुके यांनी दिल्ली येथे केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेतली. दरम्यान त्यांच्या लक्षात ही गंभीर बाब आणून दिली. या बाबीवर विचार करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री यादव यांनी खासदार मेंढे आणि आमदार फुके यांना दिले. त्यांच्या प्रयत्नांना यश आल्यास देवरी तालुक्यात उद्योग स्थापन होवून बेरोजगारांच्या हाताला काम मिळणार आहे.**

# जात वैधता प्रमाणपत्रासाठी मूळ दस्तऐवज सादर करणे आवश्यक-उपायुक्त राजेश पांडे

**गोंदिया :** जी व्यक्ती किंवा त्यांचे सख्खे रक्तनातेसंबंधातील नातेवाईक मानीव दिनांकानंतर महाराष्ट्रा बाहेरील अन्य राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत झाले असतील त्या व्यक्तीस स्थलांतरीतच्या नमुन्यात जात प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. ती व्यक्ती शिक्षण, रोजगारासाठी महाराष्ट्रात त्याच्या मूळ राज्यातून स्थलांतरीत झाला असेल तो त्याच्या मूळ राज्यातून व केंद्र सरकारकडून लाभ मिळण्यास हकदार असेल. मात्र महाराष्ट्र राज्याकडून त्याला कोणतेही लाभ मिळणार नाही. आजपर्यंत या स्थलांतरीतांच्या नमुन्यात जात प्रमाणपत्र कोणत्याही व्यक्तीस देण्यात आले नाही, अशी माहिती उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया राजेश पांडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

महाराष्ट्र शासनाने २४ नोव्हेंबर २०१७ च्या अधिसुचनेव्दारे नियम २०१२ मध्ये सुधारीत नियम १६ मधील तरतुदीनुसार अर्जदाराने त्याच्या रक्तसंबंधातील सख्खे नातेवाईकांचे जात वैधता प्रमाणपत्र संलग्न करुन स्वत:चे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्यास त्यावर प्रसिद्धी व आक्षेपाची कार्यवाही करुन यथाशिघ्र जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची तरतूद केली असली तरी त्याच नियमात दिलेल्या स्पष्टीकरणांतर्गत केवळ वर उल्लेख केलेले दस्तऐवज सादर करणे याचा अर्थ, अर्जदारास शाबितीच्या भारापासून मुक्तता झाली असा होणार नाही व पडताळणी समितीला आवश्यक वाटेल त्या त्या वेळी अर्जदार मूळ दस्तऐवज सादर करण्यास जबाबदार असेल असेही स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र नियमावली २०१२ मधील तरतुदीअंतर्गत जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरीता मानीव दिनांकापूर्वीचा जात व सर्वसाधारण अधिवासाचा लेखी पुरावा जो मूळचे महाराष्ट्रातील मागासवर्गीय व्यक्तींना मागासवर्गीयांचे आरक्षणाचा लाभ देता यावा याकरीता आवश्यक आहे व जी बाब या नियमावलीचा गाभा आहे, तो वगळण्यात आलेला नाही. ज्या रक्तसंबंधातील प्रकरणी जात व सर्वसाधारण अधिवासाचे सबळ पुरावे आढळून आले ते प्रकरणे यथाशिघ्र वैध करण्यात आले आहेत व येत आहेत.

पूर्वी जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांची मर्यादीत संख्या, प्रकरणांची जादा संख्या असतांना समितीव्दारे त्या प्रकरणात सखोल तपासणी न केल्याने, अर्जदाराचे पूर्वज मानीव दिनांकानंतर महाराष्ट्रात स्थलांतरीत झाले असतांना व त्यांचे कुटुंबियांचे सर्वसाधारण अधिवास अन्य राज्यातील असताना ती माहीती लपवून तात्पुरत्या अधिवासाचे पुराव्याचे आधारे काही अर्जदाराने सादर केलेले खोटे व बनावट पुराव्यांच्या मूळ अभिलेखाची शहनिशा न करता अनवधनाने जात वैधताप्रमाणपत्र दिले असल्याचे गोंदिया-गडचिरोली जिल्हयाच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निदर्शनास आलेले आहेत. त्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीव्दारे बनावट खोटा जाती दावा करणारे सोबतच अन्य राज्यातून गोंदिया जिल्हयात मानीव दिनांकानंतर स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय व्यक्तींना महाराष्ट्रातील मागासवर्गीयांचे आरक्षणाचा लाभ, फायदे- सवलती न देता महाराष्ट्रातील मूळचे गोंदिया जिल्हयातील सर्वसाधारण अधिवास असणाऱ्या मागासवर्गीय व्यक्तींना आरक्षणाचा लाभ मिळवून देण्याचा समितीचा प्रयत्न आहे.

समिती अंतर्गत जाती दावा पडताळणीचे कामासाठी कोणत्याही प्रकारे रक्कमेची मागणी करण्यात येत नाही. या अनुषंगाने समितीच्या कोणत्याही अधिकारी, कर्मचारी व मनुष्यबळाकडून तशी मागणी केल्यास त्याची रीतसर तक्रार लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे करावी. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र या दोन्ही बाबींसाठी अनुसूचित जाती करीता १० ऑगस्ट १९५०, विमुक्त जाती -भटक्या जमाती यांचेकरीता २१ नोव्हेंबर १९६१ आणि इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग यांचे करीता १३ ऑक्टोंबर १९६७ ही मानीव दिनांक निश्चीत करण्यात आलेली असून त्या त्या प्रवर्गातील अर्जदाराने जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी त्यांचे वडील, आजोबा किंवा पणजोबा यांचा सर्वसाधारण अधिवास त्या त्या मानीव दिनांकास ज्या क्षेत्रातील होता, तेथील सक्षम प्राधिकारी त्यांना जात प्रमाणपत्र देऊ शकेल. अर्जदाराचे कुटुंबिय व्यक्तींचे नोकरी, रोजगार, शिक्षण किंवा तुरुंगातील बंदिवास इत्यादी कारणांनी अशा क्षेत्रात अर्जदाराच्या तात्पुरत्या राहण्यामुळे तो सक्षम प्राधिकारी अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देऊ शकणार नाही.

जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करणेसंदर्भात आवश्यक त्या कागदपत्र पुराव्यांमध्ये १) अर्जदार व त्यांचे कुटुंबिय नातेवाईक यांचे जन्म प्रमाणपत्र २) शिक्षित असल्यास अर्जदार व नातेवाईकांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ३) जात नमूद असलेली जुना महसुली पुरावा या व्यतिरिक्त मानीव दिनांक लक्षात घेता महाराष्ट्र राज्यातील कायम निवासाचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

# आ.रहांगडाले शहीद महेंद्र पारधी यांच्या दोन्ही मुलाच्या नावे केली मुदती ठेव

**गोंदिया:** भारतमातेचे रक्षण करतांना भारतीय सैन्य दलातील तिरोडा तालुक्यातील चिरेखनी निवासी सैनिक महेंद्र पारधी यांना २३ मार्च रोजी वीरमरण प्राप्त झाले.या घटनेमुळे तिरोडा तालुक्यात दुखाचे वातावरण निर्माण झाले होते.



शहीद महेंद्र पारधी यांच्या मागे पत्नी व दोन मुले असून या मुलांच्या नावे तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी प्रत्येकी २५ हजार प्रमाणे ५० हजार रुपये मुदती ठेव म्हणून भेट देऊन कुटुंबियाचे सांत्वन केले. आमदार रहांगडाले यांनी एक आगळावेगळा पुढाकार घेतल्याने या कार्याची प्रशंसा सर्वत्र सुरु आहे

# थायलंडच्या भंते संघाने माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या नागपूरच्या निवासस्थानी घेतली भेट

**अर्जुनी-मोरगाव :** थायलंड येथील भंते संघांने (Bhante Sangh of Thailand) श्रामणेर भंते अशोक उर्फ गगण मलीक यांच्या समवेत माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या नागपूर येथील सुयोगनगर निवासी (ता.७) भेट घेतली. माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी सन २०१७ मध्ये महाराष्ट्रात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री असताना थायलंड येथील वाटथांग टेंम्पल येथे श्रामणेर दीक्षा घेतली होती.

यावेळी माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी माहिती दिली की, थायलंड येथील मोठा भिक्खू संघ बोधीपालो म्हणून मला ओळखत होता. महाराष्ट्रातील किंवा भारतातील एखाद्या मंत्री पदावरील व्यक्तीने श्रामणेर दीक्षा घेणे ही देशातील पहिलीच घटना असेल. थायलंड येथील बौद्ध धर्मीयांसाठी भारत ही वंदनीय भूमी आहे. या देशातूनच बौद्ध धम्म जगाच्या कानाकोपऱ्यात पसरला. भारत जगात वंदन भूमी या धम्मामुळेच आहे. थायलंड तसा चिमुकला देश. पण सयामी लोकं खुपच प्रेमळ. त्यांच्या श्वासात बुद्धत्व आणि प्रेमाचा झरा सदा प्रवाहित. या देशाच्या राजधानीतील बँकांक शहराच्या मध्यवर्ती असलेल्या वाटथांग टेंम्पलमध्ये मी श्रामणेर दीक्षा घेतली. त्यावेळी माझे अत्यंत जीवलग मित्र गगण मलीक यांनी मला सहायक म्हणून सहकार्य केले होते.

आज ते नागपूर शहरात श्रामणेर दीक्षा घेऊन आले. त्यांच्यासोबत वंदनीय भंते संघ आणि टेंम्पलमध्ये मला सहकार्य करणारे वंदनीय भंते होते. सगळ्यांना भेटून खुप आनंद झाला. धम्म प्रसारात ज्यांचे खूप योगदान आहे, ते "नटकीट" हे अगदी आवर्जून भंते अशोक उर्फ गगण मलीक यांच्यासोबत होते. त्यांना भारत म्हणजे दुसरी मायभूमी वाटते. ते सातत्याने भारतात येतात.



मागील दोन वर्षात जगात कोरोनाने थैमान घातले होते. त्यामुळे भेटी होत नव्हत्या. त्यामुळे या भेटीला खूपच महत्व होते. नटकी यांचेसोबत माझे अत्यंत घरगुती आणि जिव्हाळ्याचे संबंध. त्यांच्या कुटूंबातील प्रत्येक सदस्य खुपच प्रेमळ. त्यांची आई म्हणजे खुपच प्रेमळ. प्रेमाचा निखळ निष्पाप झराच. नागपूर शहरात सगळ्या भंते संघाचे आगमन झालं आणि त्यांचा सत्कार झाला हे बघून खुप बरे वाटले.

देशात सर्वत्र ते धम्मध्वज घेऊन जातात, हे खुपच मंगलमय कार्य आहे. धम्म प्रचाराच्या या मोहिमेत भंते अशोक उर्फ गगण मलीक हे यशस्वी व्हावेत व परम पुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मार्गाने ते धम्मध्वज घेऊन असेच पुढे जावेत हीच शुभेच्छा.!

# तहानलेल्या पक्ष्यांना मिळणार थंडगार पाणी



**गोंदिया:** उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या प्रश्नाला मानवासोबतच पशुक्ष्यांनाही सामोरे जावे लागते. या प्रश्नावर मनुष्य तोडगा काढत असला तरी पशुक्ष्यांना अनेकदा पाण्याअभावी प्राण गमवावे लागत असल्याचे दिसून येते. उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाण्यासाठी सोय व्हावी व त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, या उद्देशाने स्थानिक संडे सायकलींग ग्रूपने पक्ष्यांची तृष्णा भागविण्यासाठी ३ हजार मातीचे पाणवठे तयार केले आहेत. त्यांच्या या उपक्रमाला नागरिकही भरभरुन प्रतिसाद देत आहेत.

पूर्व विदर्भात तलाव व जंगलाचा जिल्हा म्हणून गोंदिया जिल्ह्याची ओळख आहे. मात्र नियोजनच्या अभावामुळे जिल्ह्यातील जलाशय सपाट होऊ लागले आहे. जंगलात अवैध वृक्षतोड होत आहे. त्यामुळे जलाशयाचा नैसर्गिक जलसाठा उन्हाळ्यात तळाला जातो. परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी मनुष्यासह पशुक्ष्यांना भटकंती करावी लागते.यावर उपाय म्हणून सामाजिक संस्था तथा दानदात्याकडून सार्वजनिक ठिकाणी पाणपोई सुरु केल्या जात होत्या. मात्र आता या पाणपोय्या दिसेनासे झाल्या आहेत. मनुष्य आपली सोय करवून घेत असला तरी पशुपक्ष्यांची भटकंती सुरुच राहते. पक्ष्यांनाही पाण्याची सोय व्हावी, या उद्देशाने पर्यावरण संरक्षण व सामाजिक उपक्रमात अग्रेसर असणारा गोंदिया सायकल संडे ग्रुप समोर आला आहे. ग्रूपच्या वतीने शहरातील, सुभाष उद्यान, विश्रामगृह, शासकीय कार्यालय,मंदिर, सार्वजनिक ठिकाण व निवासी वस्तीत ३ हजारपेक्षा अधिक मातीचे पात्र उपलब्ध करुन पाणपोई लावण्याची सुरवात १० एप्रिल पासून केली आहे.

या उपक्रमाला बळ मिळावे म्हणून जिल्ह्याचे अप्पर जिल्हाअधीकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपवनसंरक्षक कुलराज सिंग, पाटबंधारे विभाग शाखा अभियंता शिखा पिपलेवार, नगर परिषदचे प्रशाकीय अधिकारी सी.ए.राणे यांनी प्रत्येकाने आपल्या घराच्या आवारात सुरक्षित स्थळी पक्ष्यांसाठी पाणपोई तयार करण्याचे आवाहन केले आहे. हा उपक्रम अधिक व्यापक व्हावा, यासाठी नागरिकांना जलपात्राचे वितरण करण्यात येत आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सायकल संडे ग्रुपचे अध्यक्ष मंजू कटरे, सचिव रवी सपाटे, कोषाध्यक्ष विजय येडे, उपाध्यक्ष शिव पटले, अजितकुमार शेनमारे, पियुष हारोडे, नरेंद्र बेलगे, राकेश पेंढारकर, दीपाली वाढई, भारती लाडे, भुमिका वेगड,कल्याणी गाडेकर, दीपक गाडेकर, जितेंद्र खरवाडे, करिश्मा भोजवानी, भूमि खटवानी, वैशाली भंडारकर, शारदा बनोटे, अथर्व चौधरी, त्रिवेणी ढोरे आदी परिश्रम घेत आहेत.

# भाजपचे "मच्छर मारो" आंदोलन, नगर परिषदेवर धडकला मोर्चा

**गोंदिया :** नगर परिषदेवर प्रशासक राज सुरू असून संपूर्ण शहरात स्वच्छता व्यवस्था पूर्णत: कोलमडली आहे. नाल्या तुंबल्या असून नियमित सफाई होत नाही. या अस्वच्छतेमुळे मागील काही दिवसांपासून शहरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून डेंग्यू, मलेरिया सारखे रोगांचा प्रसार होत आहे. या गंभीर बाबीकडे नगर परिषद प्रशासनाला निवेदन देवून समस्या सोडविण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने भारतीय जनता पार्टीतर्फे (ता.८) नगर परिषदेवर धडक मोर्चा काढून "मच्छर मारो' आंदोलन करण्यात आले. यानंतर मुख्याधिकारी तथा प्रशासक यांना निवेदन देण्यात आले.



भाजप कार्यालयातून निघालेला मोर्चा शहरातील प्रमुख मार्गाने होत नगर परिषदेवर धडकला. यावेळी कार्यकर्त्यांनी हातात मच्छर मारण्याची बॅट, फवारणी मशिन व विरोधातील फलक घेवून सहभागी झाले होते. नगर परिषद प्रशासनाविरोधात नारेबाजी करीत भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आक्रोश व्यक्त केला. नगर परिषदेने तत्काळ लक्ष देवून प्रभागांमध्ये स्वच्छता मोहिम राबवून डासनाशक औषधी फवारणी करावी, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा अधिक तीव्र आंदोलन करणार, असा इशाराही भाजपच्या वतीने निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी आंदोलनात भाजपचे जिल्हा महामंत्री (संघटन) संजय कुलकणी, शहर अध्यक्ष सुनिल केलनका, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष भावना कदम, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष दिपक कदम, जि.प.सदस्य व किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय टेंभरे, ओबीसी आघाडी जिल्हाध्यक्ष गजेंद्र फुंडे, उत्तर भारतीय मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित झा, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष नारायण चांदवानी, जिल्हा उपाध्यक्ष अशोक चौधरी, विद्यार्थी मोर्चा जिल्हाध्यक्ष पारस पुरोहित, भाजयुमो शहर अध्यक्ष पलास लालवानी, माजी सभापती बंटी पंचबुध्दे, आदिंसह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# धान खरेदी घोटाळ्यातील आणखी एक प्रकरण चव्हाट्यावर

**रावणवाडी :** गेल्या अनेक वर्षापासून शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावर शासन व शेतकऱ्यांची दिशाभूल करून फसवणूक करणारे दलाल सक्रीय आहेत. त्यातच एक वर्षापूर्वी गोंदिया जिल्ह्यात धान खरेदी घोटाळाही समोर आला. या प्रकरणाची चौकशी सुरू असतांनाच रावणवाडी परिसरात बनावटी स्वाक्षरी करून एका शेतकऱ्याच्या खात्यातून बोनस व धानाचे चुकाऱ्याची रक्कम काढून घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. एवढेच नव्हेतर बँक कर्मचाऱ्यांच्या संगनमताने शेतकऱ्याच्या खात्यात जमा होणारा चुकारा काढून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी रावणवाडी पोलिस ठाण्यात पाच आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरामुळे गोंदिया जिल्ह्यातील धान खरेदी घोटाळ्यातील दलालांवर कारवाई केव्हा होणार? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

सविस्तर असे की, गोंदिया जिल्हा भात पिकाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात मुख्यता भात पिकाची शेती केली जाते. शेतकऱ्यांचे उत्पादन शासकीय आधारभूत किंमतीत खरेदी केले जाते. मात्र आधारभूत केंद्रांवर शासन आणि शेतकऱ्यांची दिशाभूल करून अनुदान लाटणारे दलाल गेल्या अनेक वर्षापासून संक्रीय आहेत. एवढेच नव्हे तर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणात धान खरेदी घोटाळा झाल्याची बाबही समोर आली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असतांनाही रावणवाडी येथील एका दलाल व बँक कर्मचारी असे एकूण ५ जणांनी शेतकरी दाम्पत्याचे जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा रावणवाडी येथून बनावटी स्वाक्षरीच्या माध्यमातून बँक खाते उघडले.

# शरद पवारांच्या घरावरील हल्ल्याचा गोंदियात निषेध

**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व खासदार शरदचंद्र पवार यांच्या मुंबई येथील (सिल्वर ओक) निवासस्थानी एसटी कर्मचाऱ्यांचा तर्फे झालेल्या हल्ल्याचा निषेध म्हणून आज शनिवारला (दि.०९) गोंदिया जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने येथील गांधी चौकातील महात्मा गांधी यांच्या प्रतिमेसमोर मुक आंदोलन करीत झालेल्या हल्ल्याचा निषेध नोंदवला.त्यानंतर घटनेच्या विरोधात घोषणाबाजी करीत राष्ट्रवादी काँग्रेसचा मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे पोचला.दोषींवर कडक कारवाई करणयासंदर्भातील मागण्यांचे निवेदन यावेळी सादर करण्यात आले.



या आंदोलनाचे नेतृत्व माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले. यावेळी जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, माजी खासदार डॉ.खुशालचंद्र बोपचे, जि.प.गटनेते सुरेश हर्षे, म्हाडाचे माजी सभापती नरेश माहेश्वरी, गोंदिया शहर अध्यक्ष अशोक शहारे, युवक काँग्रेस अध्यक्ष केतन तुरकर, युवा नेते रविकांत बोपचे, डॉ.योगेंद्र भगत, राजू.एन.जैन. सुनिल पटले, शैलेष वासनिक, विनोद हरिणखेडे, अविनाश काशीवार, प्रभाकर दोनोडे, नरेश भेंडारकर, रवी पटले, रमन उके, राजेश कापसे, प्रेम जायस्वाल, केवल बघेले, वाय.टी. कटरे, सी.के. बिसेन, नागरत्न बनसोड, अखिलेश सेठ आदी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**एसटी कामगारांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार यांच्या घरावर केलेला हल्ला हा अंत्यत निंदनीय आहे. या हल्लया मागील खऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची गरज आहे.हे तरच अशा घटनांची पुनर्रावृत्ती होणार नाही .**

**- राजेंद्र जैन, माजी आमदार**

**नेहमीच एसटी कामगारांच्या पाठीशी राहणाऱ्या खा. शरद पवार यांच्या घरावरील हल्ला हा त्यांच्या विरुध्द रचलेलाकट असून या हल्लयाचा आम्ही तीव्र शब्दात निषेध नोंदवितो. अशा घटनांची पुन्हा पुनर्रावृत्ती होऊ नये यासाठीयातील हल्लेखोरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी .**

**- गंगाधर परशुरामकर, जिल्हाध्यक्ष**




वरिष्ठ पत्रकार,कवी लेखक मा.माणिक गेडाम सरांना बेरार टाईम्सच्यावतीने ७५ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा